
MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE
AND COMMERCE SHIVAJINAGAR, PUNE 411005
LIBRARY

Ph.020-25535927/102
Email: mcasclib@gmail.com

Volume 3, Issue 2

August-October 2018

# Modlib E-Bulletin



Editor-in-Chief
Mrs. Sukhada Pandkar
Editorial Assistant
Mrs. Sarika Sable
Miss. Madhavi Kalwankar

Published by
Dr. Rajendra S. Zunjarrao
Principal

## Inside this issue:



| | |
|---|---|
| Library Updates | 2-3 |
| Events Conducted | 4-6 |
| Library Activities | 7-8 |
| New Arrivals | 9 |
| Book Review | 10-14 |
| Prestigious Donors | 15 |
| Donated Books | 16-17 |
| Upcoming Events | 18 |






## Editors dEsk

It's my privilege to present the October 2018 issue to our valued readers. The issue updates the information about library from August 2018 to October 2018. It includes the list of new arrivals, library activities, the list of prestigious donors etc.

It's my pleasure to inform you that I have been given the responsibilities as a librarian. Since I have put in as a Jr. clerk in library for the last 15 years, it is a great honour to shoulder this responsibility. It is a part of my duty to keep you update about the library. I take pleasure to put forward the issue of MODLIB.

I wish to express my gratitude to the management of P.E. Society, Principal Dr. Rajendra Zunjarrao, LMC Chairperson Prof. Mrs. J. G. Ekbote/ Prof. P. S. Chirputkar/ Dr. A. K. Pande, Library Committee Chair person Dr. Amruta Oke, Library Committee for extending their support to continue this activity and offering me the responsibility as a librarian. I must thank my colleagues in the library for their constant help and support to publish this bulletine.


**Mrs. Sukhada Pandkar**
Editor-in-Chief
I/C Librarian

## Library Updates

**Books:** Central Library has reached its books collection more than 1 lacks. Since August to October library has purchased 196 books and received 131 books as donation from our prestigious donors.

## Total Collection :


| Sr. No. | Collection Type | Number | Total Cost |
|---|---|---|---|
| 1. | Total No. of books | 1,02,315 | **1,61,54,355.41** |
| 2. | Periodicals subscribed | 112 | **98,800.00** |
| 3. | CDs/DVDs | 153 | **95,795.00** |
| 4. | Braille books | 14 | **2950.00** |
| 5. | Audio books | 1400 | Gifted |
| 6. | Daily Newspapers ( Eng, Mar, Hindi ) | 19 | |



# Library Updates

## Use of Library by the patrons from August to October 2018 :

| | | |
|---|---|---|
| Book Transactions | : | 6676 |
| Digital Library usage | : | 1834 |
| Reading Hall usage | : | 10463 |



## Events conducted in the library during August to October 2018

**National Days and Birth Anniversaries of Eminent Personalities in India celebrated at Library .**

1. **Sahityaratna Annabhau Sathe Jayanti**






**2.Krantisinh Nana Patil Jayanti**






## Events conducted in the library during August to October 2018

### 3.Sadbahvana Diwas







### 4.Raje Umaji Naik Jayanti







### 5.Pandit Dindayal Upadhyay Jayanti





## Events conducted in the library during August to October 2018

**6. Mahatma Gandhi Jayanti**




**7.Dr. A. P. J. Abdul Kalam Jayanti**






**8.Indira Gandhi Punyatithi va Rashtriya Sankalp Diwas & Vallabhbahi Patel Jayanti Va Rashtriya Ekta Diwas**




## Activities conducted in the library during August to October 2018

**Library has conducted book exhibition and sale to enrich its collection and to promote reading culture in our college on 23/08/2018 to 25/08/2018.**









A writer only begins a book. A reader finishes it.

- Samuel Johnson









## Activities conducted in the library during August to October 2018

**Library has organized display of books on account of Vachan Prerana Din as remembrance of Dr. A.P. J. Abdul Kalam on his birth anniversary 15th October.**







To succeed in your mission, you must have single-minded devotion to your goal.

A. P. J. Abdul Kalam






## Newly added titles from August - October 2018

Direct Taxes Ready Reckoner : A.Y. 2018-19 & 2019-20
Cost And Work Accounting P. 3 From 2015
Indian And Global Economic Development From 2015
Marketing Management P. 3 From 2015
Company Law From 2014
Banking And Finance P. 2 From 2015
Cost And Works Accounting P. 1 From 2014
Business Regulatory Framework ( M. Law) From 2015
Business Economics ( Macro) From 2014
Corporate Accounting From 2014
Business Management From 2014
Marketing Management From 2014
Business Communication From 2014
Cost And Work Accounting P. 2 From 2015
Advanced Accounting From June 2015
Sahitya Sarjan : साहित्य सर्जन
Recollected in Tranquility@75
Indian Government and Politics
Elements of Geomorphology
Indian Economy : Problems & Prospects
Cinema Aur Dalit : सिनेमा और दलित
Tribal: Development and Planning in Vol. 2
Underdevelopment and Naxalism in India: Reflexive Discourse and Debates
Revisiting Tribal Studies: A Glimpse After Hundred Years
Statistics : A Tool for Social Research
Groundwater Hydrology
Religious Demography of India: Myths and Realities
Education, Migration and Human Dvelopment: Kerala Experience
History Of Caste In India
Rural Development : Concept and Recent Approaches
Natural Disaster : Institutional Building for Mitigating the Impact on Vulnerable Sections
Society and Culture In India : Their Dynamics Through The Ages
Population Issues:: Studies from Uttar Pradesh and Bihar
Tribes, Castes and Development: Scenario in Three Villages of Madhya Pradesh
Santhal Women
Cost Audit & Management Audit
Capital Markets and Financial Services
Marketing Management: Indian Context Global Perspective
Strategic Management

**Book Review**





ईश्वर डॉट कॉम

राजहंस प्रकाशन, पुणे,

प.आ., २०१३





**डॉ. गजानन अपिने**
मराठी विभाग, मॉडर्न महाविद्यालय, पुणे-५.

**'ईश्वर डॉट कॉम' : धर्मव्यवहारांच्या चिकित्सेचा सघन प्रयोग**

१

विश्राम गुप्ते हे आजचे मराठीतील एक लक्षणीय आणि अर्थसघन लेखन करणारे लेखक म्हणून परिचित आहेत. त्यांनी केलेले सामीक्षालेखन आणि 'इंग्रजीतून मराठी', 'मराठीतून इंग्रजी' भाषेत केलेले महत्त्वपूर्ण अनुवादित ग्रंथ यातून त्यांची मर्मग्राही समीक्षक, अनुवादक म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण झालेली आहे. मात्र गुप्ते यांच्या समग्र लेखनाच्या केंद्रस्थानी कादंबरीलेखन आहे. विश्राम गुप्ते यांच्या आजपर्यंत एकूण चार कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. *अल तमीर, नारी डॉट कॉम, ईश्वर डॉट कॉम,* आणि अगदी अलीकडेच प्रकाशित झालेली *चेट्रक* ही कादंबरी. त्यांच्या चारही कादंबऱ्यांचे प्रथमदर्शनी ध्यानात येणारे विशेष म्हणजे, ह्या कादंबऱ्या एकूण मराठी कादंबरी प्रवाहात पूर्णतः नव्या वळणाच्या आणि अनवट ठरतील अशा आहेत. इतकेच नव्हे तर खुद्द ह्या चारही कादंबऱ्या पुन्हा कथासूत्र, व्यक्तिरेखा, रचनातंत्र, आशयव्यवहार ह्या बाबतीत एकमेकाहून वेगळ्या वाटाव्यात अशा आहेत. कादंबऱ्यांमधून स्वतःच आखून ठेवलेल्या चौकटीत कादंबरीकार बंदिस्त होत असल्याच्या ह्या काळात गुप्ते यांच्या लेखनाचे हे मोल अधोरेखित होण्यासारखे आहे. प्रस्तुत लेखात त्यांच्या 'ईश्वर डॉट कॉम' या कादंबरीविषयीचा परिचय अपेक्षित आहे.

'ईश्वर डॉट कॉम' ही एकूण अडतीस प्रकरणात विभागलेली म्हणजे जवळपास चाळीसएक तुकड्यांनी विणलेली (आजच्या) 'एका अजब नगरीची गजब कहाणी' आहे. म्हटली तर ही कादंबरी रूपककथा ठरावी. मात्र ती कल्पकतेने घडवलेली आणि संपूर्ण कल्पित असतानाही कमालीची प्रखर वास्तववादी संहिता म्हणून पुढे येते. ही कादंबरी वाचताना धमाल आणते. सोबतच ज्याच्या त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आकलनानुसार ज्याला त्याला अंतर्मुखही करत जाते. कादंबरी वाचताना एकीकडे विनोदाचे फवारे उठतात तर दुसरीकडे ती वाचकाला अंर्तमुख करत समाजव्यवहारातील परस्परविरोधीभाव, रोगटपणा, खुजेपणा खुला करत पुढे सरकत राहते. यातून कधी कधी असा संभ्रम तयार होतो की, आपल्या आजूबाजूच्या भवतालातील धार्मिक पातळ्यांवरील गोंधळ कादंबरीत आहे की, कादंबरीतील रचित गोंधळ भवतालात उतरलेला आहे? अर्थात इतकी वास्तवातील प्रखरता 'ईश्वर डॉट कॉम' नामक कल्पितकथेत उतरलेली आहे. खरंतर ही कादंबरी म्हणजे, बारक्या-बारक्या, किरकोळ, गमतीदार, मजेशीर, भावूक,

## Book Review

श्रद्धाळू, कर्मकांडी, वेडसर, शहाण्या, भन्नाट, गाढव, हास्यास्पद आणि वरवर दैवी पण खोलखोल शोकात्म असणाऱ्या उद्‌बोधक गोष्टींची गोधडी आहे.

मानवी जीवनाचा संबंध कोणत्या म्हणून गोष्टींशी येत असतो त्या सगळ्या क्षेत्रांशी साहित्याचा अनुबंध जोडता येतो. मग अशा क्षेत्रात धर्म, अर्थ, राजकारण, संस्कृती आदी गोष्टींचा उल्लेख शक्य आहे. अशा क्षेत्रातील मानवी जीवनानुभव हा कादंबरीला कथासूत्रांचे द्रव्य पुरवित असतो. ह्यातील धर्माबाबतच विचार करता असे लक्षात येते की, धर्म नावाचा मानवी व्यवहार हा माणसाच्या असंख्य गोष्टींवर प्रभाव टाकून असतो. रोजच्या जीवनव्यवहारात अनेक सांस्कृतिक-सामाजिक हितसंबंध जपणारा धर्माचा चेहरा तर सुस्पष्ट आहे. अलीकडे तर आर्थिक हितसंबंधातून धर्मव्यवहाराला आलेले बाजारू स्वरूप नजरेतून सुटत नाही. शिवाय गेल्या तीस-चाळीस वर्षात ह्या धर्मव्यवहारांने भारताचा राजकीय पोत देखील पुरता बिघडवून टाकलेला आहे. याच काळात धर्मव्यवहारातून तयार झालेली महाभयंकर गोष्ट म्हणजे जमातवाद. ह्या धर्मजमातवादाने पोखरून काढलेल्या अनेक घटनांचे आपण साक्षीदार आहोत. मुळात भारतीय लोकांची मानसिकता तपासली तर बुहसंख्येने अशी मंडळी निघतात की, जी वृत्ती आणि व्यवहार या दोन्ही पातळ्यांवर धार्मिक व्यवहारांने ओतप्रोत भरलेली आहेत. त्यामुळे अशा वातावरणातून *ईश्वर डॉट कॉम* सारखी कादंबरी निपजणे - वाढणे - लिहिली जाणे हे किती स्वाभाविक आहे याचा एक अंदाज बांधता येईल. खरंतर कादंबरी हा साहित्यप्रकार मानवी जगण्यातूनच अंश वेचत असेल तर याचा प्रभाव मराठी कादंबरीलेखनावर किती हे बघू जाता विशेष हाती काही लागत नाही. अर्थात धार्मिक अस्मितेला आलेले आजचे टोकदार स्वरूप कादंबरीकारांना शांत कसे बसविते किंवा प्रखरपणे त्याच्या बाबतीत बोलायला भाग कसे काय पाडत नाही, हे एक कोडेच आहे. कादंबरीमधून त्याबाबतची चिकित्सा सोडा तर चित्रण देखील अपवाद वजा करता आढळत नाही. अशा पार्श्वभूमीवर 'ईश्वर डॉट कॉम' चे मोल हे की, ती अशा अर्थाची मराठी कादंबरीची कोंडी फोडत सरळ धर्म आणि धर्मव्यवहाराच्या चिकित्सेच्या पातळीवर उतरते.

प्रस्तुत कादंबरीत चित्रित झालेल्या ह्या कल्पित देवनगरीत दरडोई अडीच देवळं आणि सव्वादोन चर्च येतात. मशिदीच्या बाबतीत हे प्रमाण पाऊण इतकं आहे. ते दोनपर्यंत आणण्याची शासकीय सोय आहे. धर्मस्थळांच्या या आकडेवारीवरूनच ह्याला देवनगरी म्हणून संबोधले जाते. कुठल्या ना कुठल्या श्रद्धेला या देवनगरीत कमालीची मागणी आहे. शिवाय श्रद्धा निर्माण करणाऱ्या एकाहूनएक अजिबोगरीब घटना इथे घडत असतात. या नगरीत सनातन, वैदिक, पौराणिक, ऐतिहासिक अशा विविध परंपरा रोजच्या जगण्यामध्ये बेमालूमपणे मिसळून गेल्या आहेत. विश्राम गुप्ते हे गोव्यात राहातात. त्यांनी 'ईश्वर डॉट कॉम' या कादंबरीत उभारलेली देवनगरी ही साधारणतः गोवाच आहे का अशी शंका येत राहते. या शंकेला कादंबरीत अनेक आधार मिळतात. मात्र कादंबरी जसजशी पुढे जाते तसतसा त्याचा भूगोल विस्तारत जातो. हळूहळू संपूर्ण मानवी समूहच त्यामध्ये सामावत राहते. म्हणूनच या देवनगरीचा अवकाश खूप मोठा आहे. महाराष्ट्र, भारत तर त्यात आपसूकच बसतात.

## Book Review

धर्मव्यवहाराच्या दाबातून विकलांग झालेल्या समाजात जागृती घडविणारे, प्रबोधन करणारे, तर्कशुद्ध विचारांची पेरणी करणारे मास लिडर सातत्याने अपेक्षित असतात. थेट ह्या अर्थाचे नसले तरी या कादंबरीतील प्रोफेसर व्हिक्टर डिसुझा ही व्यक्तिरेखा ह्याबाबतीत महत्त्वाची कामगिरी बजावताना दिसते. खरेतर प्रो हे नवोत्तर विचारसरणीला अधीरपणे कवटाळणारे देवनगरीतले एक जागरूक नागरिक आहेत. ते स्वतः वाणिज्य महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करतात. प्रोच्या काही धारणा आहेत. जसं की, १. नवा विचार केला पहिजे नुस्तं जुन्याला कवटाळून नाही होणार कुणाचं भलं. २. नवा विचार करणं म्हणजे काम करणं. ३. नव्या काळातला धर्म तो कोणता तर इतर माणसांच्या स्वातंत्र्यांचा आणि हक्क – अधिकारांची बूज राखणे. ४. देवनगरीत श्रद्धेची चिकित्सा कुणीच करत नाहीत. खरंतर चिकित्सेतूनच आपण सत्याच्या जवळ पोहचू शकू इत्यादी. खरतर अशा स्वरूपाच्या धारणेतूनच प्रोचे विचार स्टडी सर्कलमधून आकारत जात असतात. शिवाय ते तर्कशुद्धही असतात. याच धारणेपोटी प्रो स्टडी सर्कलमध्ये आपली बाजू सडेतोड मांडत असतात. या कादंबरीतील प्रोची व्यक्तिरेखा आणि मांडणी ही एकुणात स्टडी सर्कलला दिशादर्शक ठरणारी, सातत्याने कादंबरीतील कथासूत्र तर्कनिष्ठतेच्या लाईनवर ठेवणारी अशी झालेली आहे. कादंबरीत याशिवाय अनेक व्यक्तिरेखा आहेत. त्या सतत छोट्या छोट्या घटनांमधून उभ्या राहत असतात. त्यामध्ये मुख्यत्वे पिटर, साविओ, रॉय, जॉन, मेंडिस, लाडू, परशुराम, दत्ताराम, मॅगदलीन, लुईझा, रेश्मा, पॉल इत्यादी. ही सगळी पात्रं स्वतःची वेगवेगळी स्वभाववैशिष्ट्ये आणि श्रद्धा घेऊन कादंबरीत वावरत राहतात. आणि मग आजूबाजूला ह्या पात्रांशी नातं सांगता येतील अशा व्यक्तिरेखा आपल्या आजूबाजूच्या जिवंत जगात ओळखू येऊ लागतात. ह्यासोबतच कादंबरीतील आणखी एक व्यक्तिरेखा खूप महत्त्वाची आहे. ती व्यक्तिरेखा खरंतर कादंबरीत दोन भूमिकेत वावरते. प्रोनी चालविलेल्या स्टडी सर्कलचा ती भाग आहे. शिवाय संपूर्ण कादंबरीचे निवेदन त्याच व्यक्तिरेखेने केलेले आहे. शेवटी स्वतः मानवनगरीतील पत्रकार असल्याचा निर्वाळाही त्याच्याकडून मिळतो.

प्रस्तुत कादंबरीतील निवेदकाच्या काही धारणा आहेत. उदा. 'देवापलीकडे प्रेम असतं.' (पृ. ९२). 'ज्या आयुष्यात देवाची गरज नाही ते खरं आनंदी आयुष्य.' (पृ. २१०) अशा अनेक विशेषांना कादंबरीत अधोरेखित करता येण्यासारखे आहे. याचमुळे तो प्रो किंवा अन्य व्यक्तिरेखांहून कादंबरीच्या शेवटपर्यंत वेगळा ठरत राहतो. हा निवेदक देवनगरीतील अनोखेपण बघून, इथली विविध प्रवृत्तीची माणसं बघून, मनोविभ्रम बघून खूप एक्साइट होतो. दिसलेला माणूस, ऐकलेलं संगीत, पाहिलेला सूर्योदय, वाचलेलं पुस्तक, ऐकलेला विचार, भेटलेला मित्र ह्या सगळ्यांना बघून, ऐकून, वाचून, भेटून त्याला कमालीचा आनंद होतो. त्याला त्याच्या भोवताली घडणाऱ्या रोचक घटनांची तपशीलवार नोंद घेण्याची हौस असते. आणि त्या रोचकतेला, त्यातील विसंगततेला ओघातच तो अधोरेखित करत जातो. तो अनेक ठिकाणी रमतो, तर्कवितर्क माणसांपासून वुल्फगॅंग मोझार्टच्या वेड लावणाऱ्या सिंफनीपर्यंत. तो नितळ आहे, जिज्ञासू आहे, चिकित्सक आहे, शोधक आहे. एकूणच कादंबरीत याने आणलेली मजा काही औरच म्हणावी लागेल.

**Book Review**

पण तरीही तो कादंबरीच्या केंद्रस्थानी वावरत नाही. मराठीत अशा अर्थाचा निवेदक मग कसा संपूर्ण कादंबरी स्वतःवर पेलवत नेतो, हिरोगिरी करतो तसं तर तो मुळीच करत नाही. हे बाकी विशेषच. हाच निवेदक शेवटी देवनगरीतील गोंधळ, गोंधळामागील अर्थव्यवस्था, सामाजिक–सांस्कृतिक हितसंबंध उघड करत जाताना कादंबरीत हळूच शेवटी मानवनगरीचे पिल्लू सोडतो. संपूर्ण कादंबरीत याचा कुठेच उल्लेख न येता शेवटी चालाख निवेदक स्वतः पत्रकार असल्याचा निर्वाळा देत स्वतः मानवनगरीचा असल्याचे सांगतो. खरतर 'देवनगरी' आणि 'मानवनगरी' अशा स्वरूपाची रचना करत विश्राम गुप्ते मोठ्या चाणाक्षपणे त्यातील मूल्ययुक्ततेचा फरक सुचवू बघताहेत. खरेतर देवनगरी हीच मुळात मानवनगरी असल्याचे स्पष्ट आहे. तर इथल्या कित्येक पिढ्यांच्या चुकीने, अर्थात स्वकर्तृत्वाने मानवनगरीचे देवनगरीत रूपांतर होऊन बदनाम झालेल्या परंपरा चालाखपणे गुप्ते कादंबरीतून सूचवू बघतात. देवनगरी आणि मानवनगरी ह्या भेदातून संपूर्ण जगाचा आदिम इतिहासापासून चुकत आलेल्या मार्गावर गुप्ते बोट ठेवतात. इतिहासातील निर्बुद्धपणावर बोट ठेवत माणूसपणाची आस धरणारी कादंबरी म्हणून 'ईश्वर डॉट कॉम' चे महत्त्व उल्लेखनीय आहे.

कादंबरीत प्रातिनिधिक पातळ्यांवर आलेली माध्यमं ध्यानात घेता ती आता लोकशाहीची चौथे खांब म्हणून ओळखण्यापेक्षा भांडवलदारांच्या, संस्कतीव्यवहारांवर अंधळे प्रेम करणाऱ्यांच्या, समाजातील परंपरप्रिय धनिकांच्या उद्योजकांच्या हाती सापडलेल्या आहेत. एकूणच आज माध्यमांना आलेलं बाजारू रूप नजरेतून सुटत नाही. माध्यमांचे मालक वेगळे, संपादक वेगळे आणि माध्यमांचे व्यावसायिकपणे मार्केटिंग करणारी मॅनेजमेंटमधल्या गुरूसारखी, एखाद्या नावाजलेल्या कंपनीच्या सी.ई.ओ. सारखे काम करणारी फळी वेगळी. अशी निरनिराळी माणसं एकसूत्रांने उद्योगधंदा चालविल्यासारखी माध्यमं चालवत आहेत. त्यामुळे ते ठरवतात काय छापायचं, काय दाखवायचं. शिवाय माध्यमांना आलेल्या व्यावसायिक स्वरूपामुळे दोन माध्यमातील गळेकापू स्पर्धाही लपून राहत नाही. त्याचेही टोक उघड उघड दिसतात. एकुणातच पेड न्यूजला बळी पडलेल्या माध्यमांची प्रातिनिधिक म्हणून दै. भंबेरी, दै दंडेली, पोमा टाइम्स सारखी माध्यमं या कादंबरीत आलेली आहेत. एकुणातच माध्यमांचा कधी नव्हे इतका ढासळलेला पोत ह्यातून स्पष्ट व्हायला मदत होते.

खरेतर संस्कृती – संस्कृतीमधील परस्परसंबंध, प्रभाव आणि घुसखोरी ही अखंड चालणारी गोष्ट आहे. संस्कृतीच्या अस्मितेवाले तटबंदी उभारूनही हे रोखू शकत नाहीत याच्यावरही ही कादंबरी जाता जाता भाष्य करते. आजच्या काळात समाजव्यवहारातील बहुतांश गोष्टी किती भंपक आणि वरवर/पृष्ठस्तरीय पातळ्यांवर वावरताहेत याचं चित्रण या कादंबरीतील प्रो आणि निवेदक ह्यांच्या स्वतंत्र मांडणीतून तर कधी स्टडी सर्कल मधील अन्य मंडळींच्या वागण्या–बोलण्यातून, देवनगरीतील अनेक घटनाप्रसंगातून अभिव्यक्त होताना दिसते. खूपदा निवेदकाच्या मदतीने गुप्ते यांनी ह्या उपऱ्या जगण्यातील हवा मजेशीर पद्धतीने काढून घेतात. तर कधी तिरकस, उपरोध, विनोद तर कधी चमत्कृतीच्या सहाय्याने अनेकांची दांडी जाताजाता गुल्ल करतात. अनेकदा ह्या सगळ्यातून आजच्या सामाजिक – सांस्कृतिक व्यवहारांना बसलेली कलारूप चपराक ही या कादंबरीची जमेची बाजू मानावी लागेल. याचे कारण असे की, ही कामगिरी साधारणतः प्रबोधनकारांची असते. त्यांच्या वैचारिक साहित्यातून तर कधी त्यांच्या परखड –

**Book Review**

चिकित्सक बोलण्या – मांडणीतून ह्या गोष्टी होत असतात. मात्र आजच्या काळाची शोकांतिका म्हणजे प्रबोधनाची ही परंपराच खंडित झालेली आहे. ह्या पार्श्वभूमीवर गुप्ते यांनी खूप सावधगिरीने आणि कादंबरी कलारूपाच्या मदतीने प्रस्तुत कादंबरीतून नकळतपणे प्रबोधनाची रेष ओढू पाहतात. त्यांच्या कादंबरीतील बहुतांश भाग विनोद, उपहास, चमत्कृती म्हणून पुढे येत राहते. मात्र त्याच्या आतमध्ये कमालीच्या गांभीर्याने परंपरेतील अव्यवहार्य गोष्टींवर गुप्ते तुटून पडतात. आजच्या धर्मव्यवहारातील तर्कशून्यता दाखवता समाजातीलच धारणांवर, श्रद्धांवर प्रश्न उपस्थित करतात.

या कादंबरीत सातत्याने चर्चा, मतमतांतरे, वाद ह्या गोष्टी कादंबरीच्या केंद्रस्थानी येत राहातात. कथासदृश्य, पुढे पुढे जाणारी गोष्ट वाचायची आपली सवय ह्या कादंबरीला जोडून घेताना दमायला लावते. पण सातत्याने वाचताना असण्यापासून सुरुवात करून हसण्याच्या पलीकडे नेत जो विचार करतो त्याला खुराक देत कादंबरीत वाढत जाते. सततच्या चर्चा आणि संवादातून कादंबरीला 'चर्चा नाटक' सारखे 'चर्चा कादंबरी' म्हणावी की काय असं वाटायला लागतं. मुळात ही कादंबरी म्हणजे एका गुप्त बोलीसारखी आहे. म्हणजे काही गुप्त बोलीत त्या त्या प्रदेशातील नियमितच हसतखेळतची शब्दायोजना असते. परंतु त्याच्या अधेमधे आपल्याला सांगावयाचा संकेत पेरलेला असतो. जो त्या संबंधित समूहातील माणसालाच कळू शकतो. त्यापद्धतीने *ईश्वर डॉट कॉम* ही अशीच हसती खेळती एक संहिता आपल्यासमोर आणते. परंतु त्या छंदीफंदी संहितेच्या आतमध्ये अशा अनेक गोष्टी पेरल्या गेलेल्या आहेत की, ज्या आजच्या दैनंदिन जीवनव्यवहाराला पुरत्या व्यापून उरतात. समाजव्यवहाराला धर्मश्रद्धा–अंधश्रद्धा यांची लागलेली कीड गुप्ते अलगद– हळुवार उलगडून सांगू बघतात त्याच्या निवेदकाच्या आणि प्रोच्या आधारे. मात्र कादंबरीच्या ओघात जाता जाता गुप्ते यांनी विवेक, सहिष्णू जीवनधर्माबद्दलच्या काही मर्महो पेरलेल्या आहेत.

ही कादंबरी वाचत असताना अधून मधून अनिल दामले यांच्या 'गौतमची गोष्ट' या कादंबरीची देखील आठवण होते. 'गौतमची गोष्ट' या कादंबरीतही गौतम सहस्रबुद्धे विविध धर्मगुरूना भेटत त्याला धर्मविषयक पडलेल्या अवघड प्रश्नांची उत्तरं शोधू पाहतो. खरंतर ह्या दोन्ही कादंबऱ्यांची रचना आणि स्वरूप हे पुरेते वेगळे आहे हे जरी खरे असले तरी धर्मचिकित्सा ही गोष्ट या दोन्ही कादंबरीतील साम्य म्हणावी लागेल. अलीकडच्या काळात अनिल दामले यांनी मराठीमध्ये कादंबरी या कलारूपातून केलेल्या ठळक धर्मचिकित्सेची परंपरा पुढे राहिली नाही. खरंतर आज धर्मचिकित्सेला पूरक ठरणारी आपल्याकडील प्रबोधन परंपराच संपलेली आहे. अशावेळी त्याची अन्यत्र अपेक्षा करणे हेही भाबडेपणाचेच ठरावे. समकालीन धर्मचिकित्सेची ही पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न आपल्या परीने विश्राम गुप्ते यांनी 'ईश्वर डॉट कॉम' या कादंबरीतून केलेला आहे. त्यांनी मोठ्या खुबीने देव, धर्म, परंपरा, संस्कृती, कर्मकांड ह्या विरोधात गनिमी कावा वापरून त्याला नामोहरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे असले तरी या सगळ्या प्रक्रियेत निष्कारण बुद्धिभेद नाही, अथवा विरोधी विचारांबद्दल नाहक द्वेषही नाही; काही शोधू गेलो तर प्रत्यक्ष माणसांबद्दल वाटणारी करुणाच हाती लागते.

## Our Prestigious Donors August - October 2018




- **Ms. Rutuja Mohol, The Joint Director Higher Education Region Pune.**
- **Shri. D. P. Tripathi, Member of Parliament**
- **Mr. Yogesh Pasalkar, Student BSc. Batch 2003-2004**
- **Prof. Amruta Ajit Satbhai**
- **Shri. Sharad Paigude**

## Newly added donated books from August - October 2018

Interface : English Literature And Language
Visionary Gleam : A Selection Of Prose And Poetry
Premchand Ki Sampurna Kahaniya - Khand - 1
Premchand Ki Sampurna Kahaniya - Khand - 2
Shahon Ka Shah
Bees Rupaye
Shekhchilli Ki Anokhi Duniya
Srimad Bhagavatam Canto
Grimm Bandhuon Ki Parikathayen
Ukhare Huye Log
Koi Takleef Nahin
Ganga - Snan
Mulla Nasiruddeen Ki Anokhi Duniya
Jangal Ki Baten
Apani Khabar
Sherpur 15 Meel
Jugani
Mujhe Yaad Hai
Dus Chakra Raja
Kachhua Aur Khargosh
Gopal Bhand Ki Anokhi Duniya
Raunda Hua Niwala
Kamre Aur Anya Kahaniyan
Galicia Ki Kathayein
Nirmala
Sevasadan
Pratidgya
Gaban
Karmbhumi
Rangbhumi
Godan
Premasharam
Dubhang
Uttarayan
Goshalak
Uday - Ravi
Achhoot
Tantya
Kandid
Huckulburry Finn
Vakeel Pardhi
Mati Pankh Aur Aakash
Udhar Ke Log
Main Kyon Nahi
Machhali Mari Hui
Kursi Pahiyonwali

## Newly added donated books from August - October 2018

Tamrapat
Bhavani Nandan Shri Ganesh
Vitt Vasana
Titli
Kankal
Kaya - Sparsh
Apana Sa Koi Naam
Vindhyanchal Ka Aadhunik Hindi Kavya
Roshani Ke Raste per
Samvedana Ke Swar
Pichhale Prishth Se Aage
Aanewali Sadi Ke Liye
Niyati Ka Yayawar
Jeevan Aisa Ho
Uttararddha
Yugantar Ke Phool
Gujrat Ke Baad
Ek Samay Tha
Dukh Ki Bandishen
Lams
Sanatan Dharmakosh Antim Satya
Chaturang
Jivashmon Ki Kahani
Janane Ki Batein - Vol 1
Janane Ki Batein - Vol 2
Unposted Letter
Most & More
Rang Saarang
Flashback : Chanderi Duniyetala Manus
Tevha Aani Aata
Sagar Reddy : Naam To Suna Hoga
Slum Dog C A Ek Satya Katha



## Upcoming Events

### Celebration of National Days and Birth Anniversaries of Eminent Personalities .

# November 2018

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | **14 Pandit Neharu Jayanti** | **15 Birsa Munda Jayanti** | 16 | 17 |
| 18 | **19 Indira Gandhi Jayanti** | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | **26 Sanvidhan Din** | 27 | 28 | 29 | 30 | |


LIBRARY